महाराष्ट्र शासन
वित्त विभाग

# संचालनालय, लेखा व कोषागारे

नविन शासकीय कुटीर क्रमांक १५ व १६, प्लॉट क्रमांक १७६,फ्रि प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१.
☎ दूरध्वनी क्रमांक २२०२५२७१-२४७५ ✉ E-Mail -dat@mahakosh.in

क्र. व्हर्च्युअल ट्रेझरी/२०१३/न.क्र.११९/ ५५७ · दिनांक: 30 OCT 2013

विषय:- **मुद्रांक विक्रेत्यांना चलन विरुपित करून तात्काळ सेवा देण्याची सुविधा(Defacement before Bank Scroll) उपलब्ध करून देणेबाबत...**

पहा:- १) संचालनालयाचे आदेश क्र.संलेवको/व्ह.ट्रे०११/मुविआ/न.क्र.११९/२७१, दि.१३.१०.२०११.
२) संचालनालयाचे परिपत्रक क्र. व्हर्च्युअल ट्रेझरी/२०१३/न.क्र.११९/४०५, दि. २९.०६.२०१३.

## -: परिपत्रक :-

संचालनालयाचे संदर्भाकिंत आदेश व कार्यालयीन परिपत्रक कृपया पहावे.

जिल्हा कोषागार कार्यालयात मुद्रांक विक्रीबाबत मुद्रांक विक्रेत्याकडून रोख रक्कम / धनाकर्ष न स्विकारता यापुढे **"ग्रास"** प्रणालीमार्फतच ई-पेमेंटद्वारे रक्कम स्विकारण्याबाबत संदर्भाकिंत आदेश/परिपत्रकाव्दारे सूचना देण्यात आलेल्या आहेत. कोषागार अधिकारी, व्हर्च्युअल ट्रेझरी, मुंबई यांचेकडून सर्व जिल्हा कोषागार अधिकारी व उपकोषागार अधिकारी यांना "ग्रास" प्रणालीचे लॉगईन आयडी व पासवर्ड (फक्त अप्पर कोषागार अधिकारी (मुद्रांक) यांच्या वापरासाठी) यापूर्वीच देण्यात आलेले आहेत. जिल्हा कोषागार अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात व त्यांचे अधिनस्त असलेल्या उपकोषागार कार्यालयात सदर कार्यपद्धतीची पूर्णतः अंमलबजावणी करावी.

मुद्रांक विक्रेत्याकडून **"ग्रास"** प्रणालीमार्फतच ई-पेमेंटद्वारे रक्कम स्विकारल्यानंतर मुद्रांक विक्रेत्यांना त्याबाबतची सेवा दुसऱ्या दिवशी बँक स्क्रोल प्राप्त झाल्यावर दिली जाते. या कार्यपद्धतीत अदाकर्त्याने ईलेक्ट्रॉनिक पध्दतीने प्रदान करुनही त्यांना त्याबाबतची सेवा त्वरित प्राप्त होत नाही. त्यामुळे **"ग्रास"**प्रणालीव्दारे प्रदान केंल्यावर त्याबाबतची सेवा मुद्रांक विक्रेत्यांना त्वरित देणेबाबतची बाब संचालनालयाच्या विचाराधीन होती.

आता मुद्रांक विक्रेत्यांनी **"ग्रास"** प्रणालीमार्फत ई-चलनाव्दारे प्रदान केल्यावर बँक स्क्रोल प्राप्त होण्यापूर्वी यशस्वी (Successful) चलन विरुपित करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर सुविधा दि. ०१.११.२०१३ पासुन कार्यान्वित करण्यात येईल. या सुविधेमुळे कोषागार /उपकोषागार अधिकारी कार्यालयांस मुद्रांक विक्रेत्यांना ई-चलनाव्दारे प्रदान केल्यावर त्वरित सेवा देता येईल. अशी सेवा देण्यापूर्वी अथवा चलन विरुपित करण्यापूर्वी खालील बार्बीची तपासणी करुनच सेवा पुरविण्यात यावी.

१) ज्या चलनावर जी.आर.एन. सह बँक सी.आय.एन. आणि Reference Number निर्माण झाला आहे असेच चलन यशस्वी (Successful) चलन म्हणुन ग्राहय धरावे.

२) मुद्रांक विक्रेत्यांने चलनाची प्रत अथवा GRN क्रमांक सादर केल्यावर सदर चलनाची स्थिती "Successful or failed" कोषागार/उपकोषागार कार्यालयाने त्यांना दिलेल्या Login id मार्फत प्रथम तपासावी.

३) ज्या चलनास GRN सह Bank CIN आणि Reference Number निर्माण झाला आहे तीच चलने कोषागार/उपकोषागार कार्यालयांस सेवेसाठी त्यांचे लॉग-इन मध्ये उपलब्ध होतील.

४) बँक स्क्रोल प्राप्त होण्यापूर्वी चलनावर सेवा दिल्यावर संबंधित चलन त्वरित विरुपित करण्यात यावे.

५) अशा विरुपित (Defaced) केलेल्या चलनावर दुसऱ्या कामाच्या दिवशी (Next working day) बँक स्क्रोल नंबर अपडेप झाला आहे याची खात्री करून तशी नोंद लेख्यात घ्यावी.

६) ज्या चलनांवर GRN सह Bank CIN आणि Reference Number निर्माण झाला आहे अशी चलने बँक स्क्रोलमध्ये प्राप्त झालेली नाहीत अशा चलनांचा अहवाल कोषागार/उपकोषागार कार्यालयांस त्यांचे लॉग-इन मध्ये (ATO Stamps /STO Login) Awaited scroll या विकल्पात उपलब्ध होतील. अशी चलने दिसुन आल्यास व अशा चलनावर बँक स्क्रोल प्राप्त होण्यापूर्वी सेवा दिली असल्यास त्याबाबतचा अहवाल संबंधित कोषागार/उपकोषागार कार्यालयांनी व्हर्च्युअल ट्रेझरी कार्यालयास त्वरित सादर करावा. असा अहवाल ई-मेलव्दारे सादर करण्यात यावा.

७) मुद्रांक विक्रेत्यांनी Payment Across Bank Counter या विकल्पाव्दारे प्रदान केलेले असल्यास त्यांना चलनावरील केवळ संबंधीत बँकेचा रबरी शिक्का व सही पाहून सेवा न पुरविता प्रणालीमध्ये चलन तपासूनच सेवा पुरविण्यात यावी. म्हणजेच जे मुद्रांक विक्रेते Payment Across Bank Counter या विकल्पाव्दारे प्रदान करतील त्यांना संबंधीत बँकेने **"ग्रास"**प्रणालीव्दारे संबंधीत व्यवहार पूर्ण केल्यावर म्हणजे त्या चलनावर Bank CIN आणि Reference Number निर्माण झाल्यावरच अशी सेवा देता येईल.

तसेच संचालनालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, **"ग्रास"**प्रणालीद्वारे मुद्रांक विक्रेता प्रदान करताना योग्य विभाग पेमेंट टाईप, स्किम नेम व कार्यालय निवडत नाहीत व एकदा **"ग्रास"**प्रणालीद्वारे प्रदान केल्यावर त्या संबंधीत चलनात सुधारणा करता येत नाहीत परिणामी मंद्रांक विक्रेत्याला आवश्यक ती सेवा मिळण्यास अडचणी निर्माण होतात. तसेच याचा परिणाम कार्यालयीन कामकाजावरही होतो. भविष्यात अशा होणाऱ्या चुका टाळण्यासाठी मुद्रांक विक्रेत्यांना प्रदानाची कार्यपद्धती, प्रदान करताना निवडण्याचे विकल्प (Department, Payment Type, Scheme Name, Office Name) याबाबतची माहिती प्रशिक्षणाद्वारे अथवा कार्यालयीन परिपत्रकाद्वारे करुन देण्यात यावी. अशा सूचना कार्यालयीन सूचना फलकावर लावण्यात याव्यात.

याबाबत काही अडचणी असल्यास कोषागार अधिकारी, व्हर्च्युअल ट्रेझरी कार्यालयाशी संपर्क साधावा.

संपर्कः- कोषागार अधिकारी, व्हर्च्युअल ट्रेझरी, मुंबई.
दुरध्वनी क्र. :- ०२२-२२०४०५७०/६८/६४
ई-मेल :- vto@mahakosh.in
फॅक्स :- ०२२-२२०४०५७०

संचालक
लेखा व कोषागारे, मुंबई.

प्रत :-

१. मा. सचिव (ले.व को.), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे माहितीस्तव सादर.
३. सहसंचालक, ले.व, को.,कोकण /नाशिक /पुणे / अमरावती /नागपूर /औरंगाबाद विभाग.
४. सर्व कोषागार अधिकारी / उप कोषागार अधिकारी.
५. लेखा अधिकारी, कोषागार संकीर्ण शाखा, संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई.
६. कोषागार अधिकारी, व्हर्च्युअल ट्रेझरी, मुंबई.